पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर - ४१३२५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur - 413 255 (Maharashtra)
☏: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
◉ Examination and Evaluation Section ◉

**Ref. No.: PAHSU/BOEE/** 137 **Date :** 4 FEB 2023

प्रति,

मा.प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख

सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था/अधिविभाग

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय: ऑक्टो/नोव्हें, २०२२ स्थगित झालेल्या विद्यापीठ परीक्षा परत ०६/०२/२०२३ पासून यापुर्वीच जाहिर वेळापत्रकानुसार सुरु करण्याबाबत..

संदर्भ: १. महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती यांचे पत्र क्र. मरामविसेसं/को./२०२२-२०२३ दिनांक १३ जानेवारी, २०२३.

२. विद्यापीठाचे पत्र क्र.पु.अ.हो.सोविसो/प.मू.वि/वेळापत्रक/२०२३/२७९ दिनांक- ०२ फेब्रुवारी, २०२३.

३. उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण-२३.१/प्र.क्र.२७/विशि-१ दिनांक- ०३ फेब्रुवारी, २०२३.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने परीक्षा कामकाजावर बहिष्कार टाकण्यात आले असल्यामुळे प्रस्तुत विद्यापीठ आयोजीत परीक्षा स्थिगीत केल्याबाबत संदर्भ क्र.२ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन यांनी उपरोक्त संदर्भ क्र.३ पत्रान्वये महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीकडुन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत दि. १३.०१.२०२३ चे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे. मरामविसेसं कृती समितीच्या मागण्यांकरीता त्यामध्ये दि. ०२.०२.२०२३ पासून आंदोलन सुरु करुन दि. २०.०२.२०२३ पासनू अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये बेमूदत संप पुकारण्यात येणार असल्याचे निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने दि. ०१.०२.२०२३ रोजी मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली सदर संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यासोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये संयुक्त कृती समितीच्या मागण्याबांबत सविस्तर चर्चा झाली. कर्मचाऱ्यांच्या मागण्याबांबत शासन सकारात्मक असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही लवकरच करण्यात येईल, असे मा. मंत्री महोदयांनी अश्वासीत करुन खालील प्रमाणे विद्यापीठास कळविलेले आहे.

होळकर सोलापूर परीक्षा व मूल्यमापन मंडळ,

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर - ४१३२५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur - 413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
◉ Examination and Evaluation Section ◉

**Ref. No.: PAHSU/BOEE/** 137 **Date :** 4 FEB 2023

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार विहित वेळेत परीक्षा पार पाडण्याची जबाबदारी विद्यापीठांची आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाने आवश्यक ती उपाययोजना करुन परीक्षा विहित वेळेवर पार पडतील याची दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पर्यायी उपाययोजना आखण्यात यावी.

२. संपावर असलेल्या कर्मचाऱ्यांना कामावर हजर राहण्यासाठी आंदोलन मागे घेण्याबाबात प्रवृत्त करावे. त्यानंतर देखील संपावर जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना शिस्तभंगाची कार्यवाही का करु नये, याबाबत नोटीस बजावण्यात याव्यात आणि ह्या संदर्भात विद्यापीठाने केलेली कार्यवाही वेळोवेळी शासनास कळवावी.

त्याअनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे ऑक्टो/नोव्हें -२०२२ प्रस्तुत विद्यापीठ आयोजीत परीक्षा २३ जानेवारी, २०२३ पासनू सुरु करण्यात आले होते तथापी संदर्भ क्र.२ अन्वये दिनांक ०२ ते ०४ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत परीक्षा स्थगित करण्यात आले होते. तरी संदर्भ क्र.३ प्रमाणे प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण महाराष्ट्र शासन यांच्या आदेशानुसार दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२३ पासुन प्रस्तुत विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिर अंतिम वेळापत्रकानुसार ज्या-त्या दिवसाची (जाहिर अंतिम वेळापत्रकानुसार) परीक्षा सुरु करण्यात येत आहेत तरी विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/विद्यापीठ संकुले, सर्व परीक्षा केंद्र प्रमुख व परीक्षेशी निगडीत सर्व कर्मचारी यांना शासन आदेशानुसार कळविण्यात येते की, आवश्यक ती उपाययोजना करुन परीक्षा विहित वेळेवर पार पडतील याची दक्षता घेऊन, गरज पडल्यास पर्यायी उपाययोजना आखुन विद्यापीठ वेळापत्रकानुसार परीक्षा घेण्यात यावी. यासंबंधी पर्यायी परीक्षा कर्मचाऱ्यांचे मानधन परीक्षा नियमाप्रमाणे देण्यात येईल. विद्यापीठ वेळापत्रकानुसार ०६/०२/२०२३ सोमवार पासून नियमितरित्या होणाऱ्या परीक्षांची माहिती संबंधित सर्व घटकांना कळविण्याची जबाबदारी ज्या-त्या संबंधित शिक्षण संस्थाची राहील.

उर्वरीत विद्यापीठ जाहिर वेळापत्रकानुसार ०२ ते ०४ फेब्रुवारी २०२३ पर्यंत स्थगित झालेल्या परीक्षांचे नियोजन यथावकाश विहित वेळेत करुन विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल, याची सर्व घटकांनी नोंद घ्यावी.

वरील सर्व शासनाचे निर्देशन व विद्यापीठाचे मार्गदर्शनानुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार कार्यवाही करुन सर्व परीक्षा नियमित रित्या घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळ, पुण्यश्लोक

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ,**
**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर**
**सोलापूर विद्यापीठ**